अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०३/०१/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०१/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. सतीश पिटया जाधव, ५५ वर्षे, मुकादम, के/वेस्ट वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ३,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. २०,०००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार हे सुरक्षा रक्षक म्हणुन काम करीत असुन त्यांना कायमस्वरुपी नोकरीची आवश्यकता असल्याने त्यांचे परिचयाच्या व्यक्तीने तक्रारदार यांची ओळख लोकसेवक यांचेसोबत करुन दिली. तक्रारदार हे त्यांच्या कामासंबंधाने लोकसेवक यांना दि.१२/१२/२०२४ रोजी भेटले असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांना म.न.पा. मध्ये कचरा उचलण्याच्या गाडीवर सफाई कामगार म्हणुन नोकरी देतो असे सागुन ०६ महिन्यानंतर म.न.पा.मध्ये परमनंट नोकरी होईल असे सांगितले. त्याकरीता यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम कागदपत्र तयार करण्याकरीता रु.५०,०००/- व नंतर २,५०,०००/- असे एकूण रु.३,००,०००/-रकमेच्या लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/०९/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३१/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना अर्ज व कागदपत्रे घेवून दिनांक ०२/०१/२०२५ रोजी येण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक ०२/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. ३,००,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती लाचेच्या रक्कमेतील पहिला हप्ता म्हणून रू. २०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून रू. २०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून लोकसेवक श्री. सतीश पिटया जाधव, मुकादम, के/वेस्ट वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्रीमती पदमावती कलाल, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. सुनिल कारोटे, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net